**सामान्य प्रशासन विभाग**
दुरध्वनी क्र. ०२०-६७३३११२३
फॅक्स क्र. ०२०-२७४२५६००
ई मेल- prashasan@pcmcindia.gov.in

क्र.साप्रवि/१०-अ/कावि/१२४/२०२५ दिनांक – ०६/०३/२०२५

**विधानमंडळ कामकाज /कालमर्यादा/ अतितातडीचे**

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :- मा.महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई येथील सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन संबंधित कामकाजाबाबत.**

मा. महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई येथील सन २०२५ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक ३ मार्च २०२५ पासून सुरु झाले आहे. मा.विधानमंडळ कामकाजाचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संदर्भात उपस्थित केलेल्या **तारांकित / अतारांकित प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख सूचना, अर्धा तास चर्चेची सुचना, कपात सुचना तसेच औचित्याचा मुद्दा,** ठराव इत्यादी प्रश्नांबाबत तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती महाराष्ट्र शासनामार्फत मागणी करणेत येत असते.

महानगरपालिकेशी संबंधित उपस्थित होणारे व प्राप्त झालेले **तारांकित / अतारांकित प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख सूचना, अर्धा तास चर्चेची सुचना, कपात सुचना तसेच औचित्याचा मुद्दा, ठराव** इत्यादी विषयांचे अनुषंगाने संबंधित विभागांकडे त्वरीत पाठविणेत येत असतात. त्यावर मा.आयुक्त सो. अथवा मा. अतिरिक्त आयुक्त यांचे मान्यतेने तातडीने स्वंय:स्पष्ट अहवाल, पुरक टिपणीसह विहित मुदतीत तात्काळ शासनास सादर करणे आवश्यक आहे.

विधिमंडळ अधिवेशनाचे कालावधीमध्ये विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी विधानमंडळाच्या कामकाजाचे संदर्भात प्राप्त होणाऱ्या प्रश्नांबाबत कालमर्यादेचे गांभीर्य व महत्व लक्षात घेऊन प्राप्त होणारे **तारांकित / अतारांकित प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख सूचना, अर्धा तास चर्चेची सुचना, कपात सुचना तसेच औचित्याचा मुद्दा, ठराव** इत्यादी यांची माहिती शासनास तात्काळ पाठविणे बाबत दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे. विधानमंडळ अधिवेशन कालावधीत, विभागप्रमुख / शाखाप्रमुख तसेच संबंधित कर्मचारी यांनी आपले भ्रमणध्वनी व दूरध्वनी सुरु राहतील याची दक्षता घ्यावी. सदर बाबतच्या सुचना सर्व संबंधितांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात. दिर्घ रजेवर न जाता सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कार्यालयाचे संपर्कात राहाणे गरजेचे आहे. सदर कामकाजात विलंब, टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा झाल्यास, त्याबाबतची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची राहील, याची स्पष्टपणे नोंद घ्यावी. तसेच सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी त्यांचे अखत्यारीतील संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांना वरीलप्रमाणे कार्यतत्पर राहाणेकामी सक्त सूचना देणेत याव्यात. तसेच आपले विभागाचे संबंधित प्रलंबित असणारे प्रश्न, आश्वासने, लक्षवेधी सूचना याबाबत शासनाकडे अहवाल / उत्तरे तात्काळ सादर करुन, त्याची प्रत सामान्य प्रशासन विभागाकडे खास दुताकरवी पाठविणेत यावी. तसेच पाठवलेल्या उत्तराची एक प्रत सामान्य प्रशासन विभागाच्या prashasan@pcmcindia.gov.in या ईमेल आयडीवर पाठवण्यात यावे.

(विजयकुमार खोराटे)
अतिरिक्त आयुक्त २
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत :-

१) मा.आयुक्त कक्ष
२) मा.अतिरिक्त आयुक्त कक्ष
३) सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
माहितीसाठी व योग्य त्या सत्वर कार्यवाहीसाठी.